# Distribution of prizes for the 13th All-India Police Shooting Contest 2019 Date .16/01/2020

1) 13व्या अखिल भारतीय पोलीस नेमबाजी(क्रीडा) अजिंक्यपद स्पर्धेत मिलान खान, किरणदिप कौर यांना सुवर्ण पदक

2) सांघिक गटात बीएसएफ , पंजाब या संघांचा सुवर्णवेध

3) पिंपरी चिंचवड, 16 जानेवारी: महाराष्ट्र पोलीस यांच्या वतीने 13व्या अखिल भारतीय पोलीस नेमबाजी(क्रीडा)स्पर्धेत पुरूषांच्या 50 मीटर फ्री रायफल 3 पोझीशन प्रकारात सीआरपीच्या मिलान खान याला तर महिलांच्या 10मीटर एअर पिस्टल प्रकारात पंजाबच्या किरणदिप कौरने सुवर्णपदक पटकावले.

4) श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे बालेवाडी येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत पुरूषांच्या 50 मीटर फ्री रायफल 3 पोझीशन प्रकारात सीआरपीच्या मिलान खानने सर्वाधीक 572,22X गुण मिळवत सुवर्णपदक पटकवले, बीएसएफच्या विमलेश कुमार राठोरने 572,20X गुणांसह रौप्य तर सीआरपीच्या रितेश तन्वरने 572,16X गुणासह कांस्य पदकाची कमाई केली. सांघिक गटात बीएसएफ संघाने 1711 गुणांसह सुवर्ण पदक पटकावले. यात विमलेश कुमार राठोरने 572,झुतन मोडकने 570 व अनिल कुमारने 569 गुण मिळवले. सीआरपी संघाने 1705 गुणासह रौप्य तर एसएसबी संघाने 1696 गुणांसह कांस्य पदक पटकावले.

5) महिलांच्या 10मीटर एअर पिस्टल प्रकारात पंजाबच्या किरणदिप कौरने विक्रमी 567 गुण मिळवत सुवर्णपदक पटकावले. किरणदीपने गतवर्षीचा 565 गुणांचा एसएसबीच्या योगिताचा विक्रम मोडत ही सुवर्ण कीमगिरी केली. एसएसबीच्या रमणदिप कौरने 563,17X गुणांसह रौप्य तर बीएसएफच्या निरज कौरने 563,12X गुणांसह कांस्य पदक कमावले. सांघिक गटात पंजाब संघाने1682 गुणांसह सुवर्ण पदक पटकावले. यात हरवीन सारओने 558,रूबी तोमरने 557 तर किरणदीप कौरने 568 गुण मिळवले. सीआरपी संघाने 1672 गुणासह रौप्य तर महाराष्ट्र संघाने 1664 गुणांसह कांस्य पदक पटकावले. यात रश्मी धावडेने 563,ऋतुजा रेड्डीने 559 व वैशाली गोडगेने 542 गुणांची कमाई केली.

6) महिलांच्या सांघिक 50मीटर फ्री रायफल प्रोन प्रकारात पंजाब संघाने 1840.6 गुणांसह सुवर्अंण पदक पटकावले. यात अंजूम मुदगीलने 625.0, जसप्रीत कौरने 607.9 तर रजनीने 607.7 गुण मिळवले. आयटीबी संघाने 1831.8 गुणांसह रौप्य व एसएसबी संघाने 1828.1 गुणांसह कांस्य पदक पटकावले.

7) स्पर्धेचे पदक वितरण अप्पर पोलीस महासंचालक(गुन्हे अन्वेषण विभाग,पुणे)श्री अतूलचंद्र कुलकर्णी, कलाकार व शार्प शुटर सतीश शहा, टोकीओ ऑलंपीक ज्युरी व भारतीय रायफल असोसीएशनचे सचिव पवन कुमार यांच्या हस्ते करण्यात आले.

**स्पर्धेचा सविस्तर निकाल-**

**पुरूष-50 मीटर फ्री रायफल 3 पोझीशन**

1 मिलान खान(सीआरपी)(572,22X),2. विमलेश कुमार राठोर(बीएसएफ)(572,20X),3. रितेश तन्वर(सीआरपी)(572,16X)
सांघिक-पुरूष-50 मीटर फ्री रायफल 3 पोझीशन

1. बीएसएफ:1711:(विमलेश कुमार राठोर 572,झुतन मोडक 570,अनिल कुमार 569)

2.सीआरपी:1705:(मिलान खान 572.1,रितेश तन्वर 572.0,राजकमल तिरीके 561)

3.एसएसबी:1696:(मोनु कुमार 571,रणधिर सिंग 570,समिर अलम  555)

1. किरणदिप कौर(पंजीब) (567),2. रमणदिप कौर(एसएसबी)(563,17X),3.निरज कौर(बीएसएफ)(563,12X)
सांघिक-महिला- 10मीटर एअर पिस्टल

1.पंजाब:1682:(हरवीन सारओ 558,रूबी तोमर 557, करणदिप कौर  568)

2.सीआरपी:1672:(साक्षी डागर  562,पुष्पांजली राणा  560,रचना दोवी 550)

3. महाराष्ट्र:1664:(रश्मी धावडे 563,ऋतुजा रेड्डी559,वैशाली गोडगे 542)

**सांघिक- महिला- 50 मीटर फ्री रायफल प्रोन**

1.पंजाब: 1840.6(अंजूम मुदगील 625.0, जसप्रीत कौर 607.9, रजनी 607.7)

2. आयटीबी: 1831.8(मोनीका सादी 617.6, पुजा 610.2, ममता ओली604.0)

3. एसएसबी: 1828.1(श्वेता यादव612.4, प्रियांका रॉय 609.6, शेफाली कलगोत्रा606.1)


lia Police Shooting


Shooting (Sports) Championship 2019











SHOOTING




13th All India Police Shooting (Sp


th All India Police Shooting (Sports) Championshi



India Police Shooting (Sports) Champions


3th All India Police Shooting (Sports) Championship 20






13th






8
9